**प्रेसनोट तारीख २३/०५/२०१९**

## येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

## देशी विदेशी दारुची ड्रायडे दिवशी चोरुन विक्री करणारे महिलेस अटक सुमारे १,७५,०००/- रु. देशी विदेशी दारु जप्त.

दि.२३/५/२०१९ रोजी लोकसभा निवडणुक निकालाचे अनुषंगाने येरवडा पोलीस ठाण्याकडील तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी पेट्रोलींग फिरत असताना सपोफौ बहिरट यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, ड्राय डे असलेने येरवडा भाटवस्ती येथे काही महिलांनी देशी विदेशी दारुचा साठा करुन त्याची चोरुन चढया दराने विक्री करीत आहेत अशी बातमी मिळाल्याने येरवडा विभागाचे सहा.पो.आयुक्त श्री डॉ शिवाजी पवार , मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक मंगेश भांगे , महिला पोलीस उपनिरीक्षक शुभांगी मगदुम व तपास पथकाचे कर्मचारी यांनी सदर भागात सापळा लावुन महिला नामे १) निर्मला नरेश मिनेकर वय ४८ वर्षे रा. भाटवस्ती येरवडा पुणे हिस ताब्यात सुमारे १,७५,०००/- (एक लाख पंच्याहत्तर हजार रुपये ) देशी विदेशी दारु, बियर, बाटल्या, असा माल जप्त केला आहे. सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदरची कामगिरी मा. श्री प्रसाद अक्कानवरु पोलीस उपआयुक्त परि-४ पुणे, मा.सहा.पोलीस आयुक्त डॉ शिवाजी पवार, मा.राजेंद्र कदम वरीष्ठ पोलीस निरीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली मंगेश भांगे पोलीस उपनिरीक्षक, शुभांगी मगदुम महिला पोलीस उपनिरीक्षक, सहा.पो. फौजदार श्री बाळासाहेब बहिरट, पो.हवालदार हणमंत जाधव, हरीष मोरे, पोलीस नाईक, मनोज कुदळे, अशोक गवळी, नवनाथ मोहीते, पंकज मुसळे, पो.कॉ.सुनिल सकट, समीर भोरडे, अजय पडोळे, अजित मगदुम यांनी केलेली असुन पुढील तपास चालु आहे.

